लक्ष्मीबाई शिंदे, वामन गोंदकर वगैरे मंडळीनें सहाय्य करून वाढण्याचा बंदोबस्त केला. द्वादशीस गोपालकाला होऊन बहुतेक पाहुणे राहुणे मंडळी आपल्या गांवाकडे निघून गेली. कांहीं मंडळी पौर्णिमा झाल्यावर गेली. तरी या उत्सवांत हजर राहून अंगमेहनत केली व ज्यांनीं द्रव्यद्वारा सहाय केलें त्या सर्वांचें, त्यांच्या मुलाबाळांचें आरोग्याचें, मानमरातबाचें, इभ्रतीचें समर्थांनीं कृपाकटाक्षानें अवलोकन करून रक्षण करावें. आम्ही सर्व महाराजांचीं अजाण लेंकरें आहों. तेव्हां आमचे हातून जाणून न जाणून अथवा विकारवश होऊन ज्या कांहीं चुका झाल्या असतील त्या अपराधांचा व चुकांची माफी श्री समर्थांनीं करावी, अशी सर्वांतर्फे समर्थांच्या पायापाशा माझी नम्र विनंती आहे. ती समर्थांनीं मान्य करून अशीच सालोसाल या दासाच्या हातून उत्सवाची सेवा घेत जावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पुंडलीक वरदे हरी विठ्ठल । सीताकांत स्मरण जयजयराम । पार्वतीपते हरहर महादेव । श्रीसमर्थ रामदास । ज्ञानेश्वर तुकाराम । महाराजकी जय । श्रीसद्गुरु साईबाबा महाराजकी जय । श्रीवामन शास्त्री महाराज की जय.

सकल संतांचा चरणरज

**दासगणू**

श्री दास गणू महाराजांच्या ता. १८--४--३१ च्या शिरर्डीच्या पत्रांतील उतारा:—

"चंद्रभागाबाई आतां हिंडूं फिरूं लागली आहे. पण नाकाची जखम अद्याप भरावयाची आहे. व तिला कमींत कमी तीन आठवडे तरी लागतील असें डाक्तरचें म्हणणें आहे. तिच्या आप्त मंडळींस मी २।४ पत्रें पाठविलीं; पण कोणी आलें नाहीं व पत्रही कांहीं पाठविलें नाहीं.

असो. बाई वाचली व उत्सवावर अभिश्राप महाराजांनीं येऊं दिला नाहीं हीच मोठी गोष्ट झाली. जखमा इतक्या भयंकर होत्या कीं, बाई वाचणें शक्य नव्हतें. पण श्री साईबाबांची कृपा म्हणून बाई वाचली."

६

# श्रीशंकर

## श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिकसंतचूडामणी समर्थ श्रीसाई-बाबा महाराज संस्थान शिर्डी ता. कोपरगांव जि. नगर यांच्या शके १८५३ च्या श्रीरामनवमीच्या उत्सवाचा जमाखर्चाचा तपशील:—

**जमा रु.**

५० रा. चांदोरकर सि. स. भंडारा
२५ ,, नारायणराव गोविंदराव बुळे सरकार इंदूर
२५ ,, भवानराव वनमुडे मह्
३१ ,, रंगनाथराव ऊर्फ दादासाहेब वरुडकर वकील
१५ ,, धोंडोपंत वकील नांदेड
१५ ,, बापूराव राघोजी बोरावके शिर्डी
२७ ,, नागोबा बाळुजी वंजारी उमरी
११ ,, वामनराव औरंगाबादकर खांडवा
९ ,, गोविंद वामन कवटिकवार.
९ ,, बाबा रामचंद्र पतेवार गव्हाण
९ ,, चिनैया मुकावार मुखेड
९ ,, गोविंद व्यंकटी महाजन मुखेड
९ ,, मारुती विरशा पत्तेवार मुखेड
९ ,, मुरलीधर मामडे मुखेड
११ श्री. लक्ष्मीबाई जोगळेकर पुणें
१० रा. त्रिंबक आनंदराव कर्णिक यांचे मार्फत

- ५ त्रिंबक कर्णिक
- २ द्वारकानाथ मुकुंद दुर्ग
- १ शंकर अनंत प्रधान
- १ मनोरमाबाई
- १ शांता

———
१०

**खर्च रु.**

३१३८≡||| कचरूशेट आनंदराम मारवाडी. शिर्डी यांस किराणी, भुसारी, सामानाबद्दल दिले त्याचा तपशील.

- २६४||=|| श्रीरामनवमीच्या सामानाबद्दल.
- १९||-|| मुसलमान लोकांस गूळ भात चें जेवण दिलें त्या सामाना बद्दल.
- २८|≡||| हनुमान जयंतीचे सामानबद्दल.

———
३१३८≡|||

१०० जमादार उसमान दारूवाला अकोलेकर यांस दारू उडविल्याबद्दल दिले.

७५ गोविंद काशिनाथ करंबेळकर पुणें आचारी इसम तीन यांस दिले त्याचा तपशील.

- ४५ स्वयंपाकाबद्दल
- २४ गाडीभाड्याबद्दल
- ६ उपरणें पान एक बक्षीस

———
७५

**जमा रु.**

५ डी. एम्. राजा फारसी कॉलनी दादर
६॥ रा. केशव गोपाळ तळवलकर उमरावती
५ ,, तुळशीदास खेमजी सांताक्रूझ
५ ,, 'क्ष' इंजीनियर नाशीक
५ श्री. सुभद्राबाई खांडवा

———

३००॥।
५ डॉ. धोंडोपंत अजिंक्य मुंबई
५ श्री. लक्ष्मीबाई कोल्हटकर दादर
५ रा. जीवनलाल गंगाराम परभणी
१० ,, बाळकृष्ण नारायण देशपांडे
११ ,, अण्णासाहेब बोराळकर
५ ,, रघुनाथ बळवंत आळेकर इंदूर
३। ,, दत्तोपंत मास्तर मांजरम
३ ,, त्रिंबक बळवंत छत्रे
३ ,, बळवंत
५ ,, विनायक अण्णाजी अंधेरी
२ ,, नारायण व्यंकटेश भाकूत
२।≶ ,, रामराव दिवाळकर कलमनुरी
२।≶ ,, नागोराव उंचेगांवकर कलमनुरी
१॥≈ ,, राजेश्वरराव गांजापुरकर कलमनुरी
१॥≈ ,, बापूराव गोविंदराव यंबल
१ ,, गंगाधर पांडुरंग पाळेकर
१ ,, गणपतराव मोरेश्वर
१। श्री. मिनाबाई
१ सौ. शांताबाई मु. नवलकर मुंबई
१ सौ. चंपुबाई ग. कोठारे मुंबई
१। रा. नामदेव अबाजी शिर्डी
१ ,, बाबाजी माधवराव मोहिले
१ ,, आनंदराव रामचंद्र

**खर्च रु.**

३४। दुधाबद्दल पांच दिवसांत खर्च झाला तो

१८। बाबा धर्माधिकारी नगरकर यांस
१० दक्षीणा रामायण वाचणें-बद्दल
२। भाड्याबद्दल
६ उपरणें पान १

——

१८।

१४ वासुदेवभट भंडारकवठें पंढरपूर यांस
५ दक्षणा अभिषेकाबद्दल
३ भाडें
६ उपरणें पान १

——

१४

———

५५४॥≶॥।

२० महंमद सयदू व हुसेन सयदू राहतेकर यांस बाजाबद्दल
१८ बाजाबद्दल
२ ताशेवाला

———

२०

४६॥-॥ किरकोळ खर्च पाणीवाला, सरपण वाला, मजूर, गाडीभाडें, रांजण, भांडीं घांसणारीण, पगीट. न्हावी. शिंपी वगैरेबद्दल पावती बरहुकूम खर्च

| जमा रु. | | खर्च रु. | |
|---|---|---|---|
| १ | रा. भाऊ अबाजी वैद्य | ९४ | श्री साईमहाराज संस्थानांतील सेवेकरी व इतर नोकर मंडळीस रामनवमीचे दिवशीं प्रत्येकीं एक प्रमाणें उपरणें वाटलीं त्याचा तपशील |
| २। | ,, दत्तात्रय नारायण कौठाळकर | ५ | नानूभट संगमनेरकर |
| १। | ,, घनशाम शिवराम पोतदार | ६ | नाना चोपदार |
| १। | ,, दत्तात्रय केशव कामटीकर | ६ | बाळा चोपदार |
| १॥=,, | नागोराव पिंराळीकर नांदेड | १० | बापाजी लक्ष्मण कुलकर्णी |
| १॥=,, | सावळाराम नांदेडकर | १० | नारायण कुलकर्णी |
| १। | ,, आत्माराम हरी जोहरे | ४ | सुरदास |
| १। | ,, रघुनाथ वामन श्रृंगारकर | ४ | अहल्या |
| २ | श्री. रुखमाबाई करमरकर | ४ | रामा न्हावी |
| ॥।- | रा. देवीदास सबनीस कलमनुरी | ४ | बयाजी जगताप |
| ॥।- | ,, कृष्णनाथ विठ्ठल रुद्रावार | ४ | गटू शिंदे |
| ४ | ,, सुंदरराव दि. नवलकर | ३ | माणिक ताशेवाला |
| १ | ,, यमाजी गंगाराम जगताप इंदूर | ४ | माधव फसले |
| ९४ | | ४ | रंगनाथ गुरव |
| २२ | श्री. नारायणराव तेंडुलकर यांचे मार्फत आले. | ३ | भिका बत्तीवाला |
| ७ | श्री. पिरुबाई रा. कोठारे | ४ | अण्णा |
| ५ | ,, दिनकर महादेव जुवळे | ३ | मार्तंड भगत |
| ५ | सौ. अनाबाई मो. तळपदे | ८ | बाळा गुरव |
| ५ | ,, पार्वतीबाई शा. कोठारे | ३ | विश्वनाथ गुरव |
| २२ | | ३ | जानक्या महार |
| १५ | श्री. सावळाराम यांचे मार्फत. | २ | पुंजा कोळी |
| २ | रा. सावळाराम आत्माराम शिरोडकर कुर्ला | ९४ | |
| २ | ,, रामकृष्ण सावळाराम | १०८- | जव्हारमल्ल मारवाडी शिर्डी यांस मांजरपाट कापड गरीबांस सदरे शिवण्याकरितां आणले |
| २ | ,, वासुदेव सावळाराम | ६ | उदबत्तीचे पुडे आले ते खर्च |
| १ | ,, आत्माराम सावळाराम | १७६॥=॥ | |
| २ | सौ. राधाबाई वासुदेव | | |
| २ | सौ. इंदिराबाई रामकृष्ण | | |

**जमा रु.**

१ कृष्णाबाई
१ शकुंतलाबाई
२ सौ. लक्ष्मीबाई वासुदेव

१५

४२॥ श्री. र. भा. पुरंदरे यांचे मार्फत
१ रा. मुकुंद महादेव मोहिले
२ ,, पुरुषोत्तम गोपाळदास
२ ,, हरि भाऊ शिरसाठे
२ सौ. चंपुबाई चोणकर
५ रा. आनंदराव खंडेराव
१ श्री. काशिबाई कानिटकर
११ रा. लक्ष्मण गोविंद मुंगी
५ ,, रामचंद्र सिताराम देव
४ ,, हरिश्चंद्र मिस्त्री अंधेरी
२ ,, श्रीकृष्ण पुरुषोत्तम अंधेरी
२ ,, विनायक गिरिधर तलाटी
२ ,, जनार्दन आत्माराम
२ ,, छगनलाल
१ ,, गणेश आत्माराम
-॥-,, दशरथ गणपत

४९॥.

२६॥= श्री. धोंडीराम ताराचंद मारवाडी उमरी

१०६८=

१४९॥ श्री. रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड यांचे मार्फत आले ते
१० रा. लक्ष्मणराव निंगोजी रेड्डी
२ ,, यशवंतराव गाळवणकर
३ ,, महादेव विष्णू चौबळ

**खर्च रु.**

९॥ लक्ष्मीबाई जोगळेकर पुणें यांस दिले त्याचा तपशील.
५ केशर
१॥ बेदाणा
१॥ बदाम
१॥ हिंग

९॥

५।॥≈॥ पुणतांबेकर भटजी मंडळीस अभिषेकाबद्दल दक्षणा दिली
५ श्रीसांई महाराजांचे नैवेद्यावरील दक्षणा
५॥ भोजन दक्षणा चार दिवसांची.
५ अबदुलभाईला कपडा दिला.
४॥= श्री. सांई महाराजांकडील खर्च.
५। रंगरंगोटी, सुतळी, काथ्या वगैरेबद्दल. हस्तें बाळा गुरव
५ एकादशीचे दिवशीं टग्बुजें, खरबुजें. संत्रीं, काकडी, चिकू, मुसंबी अशीं फळें आणिलीं.
१ मुसलमान फकीर लोकांस चिराखीबद्दल दिले.
२ विडयाच्या पानाबद्दल दिले.
१ श्री. पांडुरंगापुढे दक्षणा ठेवली
६ नागोराव पिंगळीकर यास प्रसाद म्हणून रुमाल दिला. कीर्तनाबद्दल
१ मंडळीस प्रसाद देण्याकरितां नारळ आणिले.
१ कढईचें भाडें दिलें. हस्तें बाळा गुरव
५ कोपरगांवच्या भटजी मंडळीस दक्षणा दिली

**जमा रु.**

३ रा. श्रीधर नारायण खारकर
२ सौ. सरस्वतीबाई कोठारे
१ श्री. विठ्ठल जगन्नाथ खोत
२॥= डॉ. श्रीपतराव शांतमूर्तेराव कैंकिणी.
२ श्री. बाळकृष्ण राघव सावंत
५ ,, मोरेश्वर नारायण सावे
१॥= ,, शामराव भास्कर कंटक
२ ,, सीताराम गंगाराम सावंत
१० ,, दाजी विठ्ठल सांबारे
१ ,, एन्. बी. राणे
२ कु. शांताबाई ब्रह्मांडकर
५ श्री गोविंद नारायण दाभोळकर
४ ,, आनंदराव डोळस
३ ,, जे. आर. दळवी
१। ,, त्रिंबक गोविंद पाटील
१० डॉ. केशरीनाथ वासुदेव सावे
१। श्री. यशवंत बिठोबा देसाई
१० ,, शंकर विठ्ठल राशिनकर
५ सौ. यमुनाबाई सखाराम
५ श्री. लक्ष्मण वासुदेव गव्हाणकर
१। ,, सदाशिव रामचंद्र गाळवणकर
५ ,, आत्माराम ला. आरोळकर
१ ,, जी. के. राणे
१ ,, शांताराम बळवंत नाचणे
२ सौ. लक्ष्मीदेवी तर्खड
१॥ श्री. ज्योतींद्र रामचंद्र तर्खड
१० ,, रा. आ. तर्खड
५ ,, रा. ब. मोरेश्वर वि. प्रधान

**खर्च रु.**

९ मालेगांवकर भटजीस खादीचें ठाण व धोतर दिलें
३ लिंबगांव व कोकम ठाण भटजी मंडळीस दक्षणा व पुणताबेकरांसही दक्षणा
५ अनाथ विद्यार्थीगृह यांस दिले.
३ साळी हरदास पैठणकर उपरणें दिलें
२॥ किरकोळ खर्चाबद्दल
१ जोंधळ्याच्या लहाया व गुलाला बद्दल

---

८७।०॥

१५ उत्सवाच्या पत्रिका. छपाई व टपाल खर्चाबद्दल
९ तीन पायल्या तिखट चंद्रभागाबाई यांजकडून आले तें खर्च
७२ तूप डबे ३ आले ते खर्च
९ गूळभेली तीन बापूराव व गांधी यांचे कडून आला तो खर्च
२५ दामूशेट कासार यांनीं एक पोतें तांदूळ, लाडू दिले ते ख°
५ प्रसाद पाठविला त्याबद्दल खर्च

---

१३५

१००॥।०॥ इमाम्या करितां खर्च हस्तें तात्या पाटील कोते

---

१०५४।≶।

एकंदर दहाशें चौपन्न रुपये सव्वा सात आणे

जमा रु.

५ श्री. जनाबाई सीताराम घटे
२॥ ,, महादेव गंगाधर कोरान्ने
२॥ ,, कृष्णाजी नारायण व
सौ. मनोरमाबाइ कृष्णाजी
पेंडुरकर
१ रा. रामचंद्र रामकृष्ण सामंत
१० ,, रंगनाथ नारायण
५८= ,, सेक्रेटरी अतिरुद्व
महोत्सव मडळ इंदूर
१। हरिगोपाळ सकपाळ
१८= श्री. यशोदाबाई नारायण नाईक
२॥ रा. प्रेमजी नागूजी परदेशी पुणें

------

१४९॥

९ श्री. चंद्रभागाबाई मांजरमकर तीन
पायल्या तिखट आणून दिलें
७० खालील मंडळींनीं उपरणेचीं पानें
दिलीं त्याचा तपशील
८ श्री. धोंडोपंत वकील
५ श्री. अण्णासाहेब बोराळकर
६ " चिनैया मुकावार
६ " गोविंद व्यंकटी महाजन
८ " गोविंद पानशोडीकर
८ " मारुती पत्तेवार
४ " बाबा पत्तेवार
४ " नागोबा वंजारी
४ " बाबा रंगारी
४ " दादासाहेब वरुडकर
४ " नरसिमा रंगारी
३ " रामराव दिवाळकर
३ " राजेश्वरराव गांजापूरकर
३ श्री. चंद्रभागाबाई मांजरम

---

७०

**जमा रु.**

१३ श्री. दासगणू यांचे पुढें आलेले

७२ तीन तूप डबे मोंगलाईतून आले त्याचा तपशील

२४ श्री नारायण रंगारी एक डबा [ नागोबा वंजारी ] दिला

२४ श्री बापूराव पाटील मांजरम एक डबा तूप दिलें

२४ श्री बाबा रंगारी व नरसिंगा रंगारी एक डबा तूप दिलें

---

७२

९ गूळभेली तीन आल्या त्याचा तपशील

६ श्री. बाबूराव बोरावके दोन भेली

३ श्री वासुदेव काशिनाथ गांधी राहातें एक भेली

---

९

---

१७३

२५ श्री. दामूशेट कासारनगर यांनीं एक पोतें तांदूळ व बुंदीचे लाडू दिले

६ श्री भवानिशंकर गणपत ससित्तल यांचेकडून उदबत्ती पुडे दोन आले

१८॥≡ श्री नारायण रंगारी उमरीकर

---

४९॥≡

१००।॥०॥ श्री. साईबाबांच्या मंदिरांतील व मशिदींतील पेटींत आलेली जमा

---

९७३॥।-॥

८०॥-॥। कमी पडलेली रक्कम दासगणूनीं दिली

---

१०५४।≡।

एकंदर दहाशें चौपन्न रुपये सव्वा सात आणे

# महाराजांचे अनुभव

जव्हेरबाई बिल्डिंग, जुनें कुर्लें.

संपादक श्री साईलीला यांस, साष्टांग नमस्कार वि. वि. आपणाकडे श्रीबाबांचे अनुभव पाठवीत आहें. तरी आपले इच्छेप्रमाणें प्रसिद्ध करावेत:—

**अनुभव १ ला:** – गेल्या आषाढ महिन्याची गोष्ट. आमांशाच्या विकारानें मी जवळ जवळ तीन आठवडे आजारी होतें. ताप पतकरतो; पण हें दुखणें अतिशय त्रासदायक. घरांत दुसरें वडील माणूस अगर मदत करण्यास कोणी नसल्यामुळें घरचीं सर्व कामें वेळेवर करून दुखणें कसें बाजूस ठेवावें लागतें तें फक्त ज्याला नेहमीं दुखण्याचे प्रसंग येतात त्यालाच समजेल.

मला थोडासा आराम पडावयास व माझ्या लहान मुलीला वरील विकार होण्यास एकच वेळ. झालें. दिवसांतून आठ दहा वेळ मुलीस ढाळ होऊं लागले. होता नव्हता तो सर्व उपाय करून पाहिला; परंतु गुण नाहीं. त्यामुळें आम्हीं उभयतां भिऊन गेलों. दुसऱ्या कोणाच्या मदतीची अपेक्षा नसल्यामुळें श्रीबाबांवरच पूर्ण भरंवसा ठेवला. त्याच रात्रीं श्रीबाबांनीं स्वप्न दृष्टांत देऊन सूचना दिली कीं, तुझ्या बाळ औषधाच्या पिशवींत जायफळ व कडू मायफळ आहे तें उदईक थंड पाण्यांत उगाळून दे, आजार नाहींसा होईल. झालें. श्रीबाबांच्या आज्ञेप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं वरील औषध दिलें व चमत्कार काय सांगावा ! तेव्हांपासून तिला एकही ढाळ झाला नाहीं. ( यापूर्वीं वरील औषध भाजून तुपांत उगाळून चाटण करून दोन वेळां दिलें होतें; पण गुण आला नव्हता. )

**अनुभव २ रा:**—श्रीसाईबाबांच्या पवित्र क्षेत्रीं आम्हीं केव्हां एकदां जाऊं व समाधिदर्शनाचा लाभ घेऊं अशी एकसारखी तळमळ लागली होती. गेल्या गोकुळ अष्टमीस जाणें झालें नाहींच, परंतु त्या वेळीं विचार ठरविला कीं, श्रीबाबांची कृपा असेल तर येत्या रामनवमीस आम्हांला ते

तिकडे नेतील. माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें श्रीबाबांचें रोज चिंतन होत असे. व त्याप्रमाणें मला प्रत्यक्ष शिरडीचा दर्शन लाभ ( स्वप्नांत ) मिळूं लागला. चैत्र महिना जवळ येऊं लागला. एके दिवशीं मला थोडीशी धास्ती वाटूं लागली कीं, शिर्डी गांवांत आम्ही पूर्वीं कधींही गेलों नसल्यामुळें व पदरीं लहान मूल आहे तरी तिकडच्या अडचणी कशा काय असतील कोण जाणें. हा विचार चालला असतां श्री बाबांनीं रात्रौ स्वप्नांत सांगितलें कीं, "पोरी, भिऊं नकोस. माझा भाऊसाहेब तुला नेण्यासाठीं पाठवून देतों. काळजी करूं नकोस."

रात्रौ १० च्या नागपूर एक्सप्रेसनें आम्ही उभयतां व मुलगी ( वय तीन वर्षें ) मिळून निघालों. आमच्या डब्यांत साकोरीचे एक इसम आपल्या मुलांसह बसले होते. त्यांचींही लहान दोन मुलें होतीं. मनमाड स्टेशनवर आम्ही सर्वजण उतरलों; व थोडें अंतर चालून गेलों असेल नसेल इतक्यांत एक इसम हातांत कंदील घेऊन येत असलेला दिसला. आमच्याबरोबर दुसरीं साकोरीचीं मुलें सुद्धां होतीं. परंतु त्या मनुष्यानें माझ्या हळू हळू चालत असलेल्या मुलीकडे पाहून विचारलें कीं, मी या मुलीस वर घेऊं का ? मी उत्तर देवविलें कीं, नको, तिला चालावयाची हौस आहे, चालूं द्या. नंतर स्टेशनचा पूल उतरेपर्यंत वरील गृहस्थ आमच्याबरोबर चालत होते.

रजा नसल्यामुळें उत्सवाच्या दुसऱ्या दिवशीं आम्हांला शिरडीहून परतावें लागलें. निघण्यापूर्वीं एक वेळ मशीद, समाधि व कांहीं भक्त यांना नमस्कार करून जावें म्हणून निघालों. दर्शन घेतां घेतां, समाधीजवळ आलों तों समाधीच्या डाव्या बाजूस स्टेशनवर दिसलेले गृहस्थ उभे असलेले दिसले. मनांत विचार आला कीं, यांना नांव विचारावें. चवकशी करतां त्यांचें नांव भाऊसाहेब बैसास म्हणून समजलें. त्या वेळीं आम्हां उभयतांस जो कांहीं श्रीबाबांच्या लीलेचा हुंदका आला व डोळे प्रेमाश्रूंनीं भरून आले ते लिहून वर्णन करणें माझ्या शक्तिपलीकडचें आहे.

**सौ. मनोरमा कृ. पेंडुरकर.**

श्री. आत्माराम ला. आरोळकर मु॥ गुंताकल यांच्या ता. २२-४-३१ च्या पत्रांतील उतारा:—

माझ्या अनुभवाबद्दल अझून लिहावयास वेळ मिळत नाहीं, तरी एक धाकटासा अनुभव लिहितों:—

मी गेल्या चंद्रग्रहणाच्या दिवशीं बँगलोरला गेलों होतों. दुसरे दिवशीं टॅक्सी घेऊन फिरावायला गेलों. बहुतेक सर्व फिरलों. मोटार सावकाश चालली होती. बसवन्नगुडीजवळ एक लहान मुलगा हॉर्नचा आवाज ऐकून गोंधळून आडवा आला. त्याला वांचवावयाला ड्रायव्हरनें गाडी बाजूस केली. ती फ ूरकन नाल्यांत गेली. अशा रीतीनें हादरून नाल्यांत पक्की बसली कीं, तेथून निघेना. ४००।५०० माणसें गोळा झालीं व आंतली मंडळी सुरक्षित आहेत किंवा नाहींत तें अगोदर बघून नंतर मोटारची स्थिति पाहून लोक विचारांत पडले कीं, हें कसें झालें. आंतील मंडळी स्वस्थ. माझ्या मुलीला किंचित हबका लागला तरी ती ओरडली नाहीं, तर विमानांत बसल्याप्रमाणें स्वस्थ होती.

लोकांना आश्चर्य वाटलें कीं, हीं मोटारमधलीं माणसें वांचलीं कशीं? खालीं उतरून पाहिल्यावर खरी स्थिति माझ्या लक्षांत आली व वाटलें हें सांई माउलीचेंच काम. त्या माउलीशिवाय अशा रीतीनें आमचें रक्षण कोण करणार? आमचा त्यांच्यावर पूर्ण भरंवसा आहे कीं, त्यांनींच आमचें रक्षण केलें.

## प्रतीकपूजा

सद्गुरु म्हणजे ईश्वराचें ज्ञानवैराग्यसंपन्न प्रतीक होय, आणि त्या जड प्रतीकाची श्रद्धायुक्त मनानें पूजा केली तर तीही ईश्वरास पावते, ह्याचें उदाहरण महाभारताच्या आदिपर्वांतील द्रोणाचार्यशिष्य एकलव्य ह्याच्या आख्यानांत सांपडतें. ह्या संबंधाची एक ऐकीव सांईलीला अशी आहे. एकदा एक श्रीमती म्लेंच्छ स्त्री शिरडीस आली होती. ती नित्य एक ...

श्रींनीं तिजपाशीं मुळींच दक्षिणा मागितली नाहीं. तेव्हां चौथे दिवशीं ती श्रींना म्हणाली, "बाबा ! आपणास गुरु करावयाच्या इच्छेनें मीं येथें आलें आहे. सबब माझी दक्षिणा घेऊन आपण मला उपदेश करावा." हें तिचें बोलणें ऐकून श्री म्हणाले कीं, गुरु मानावयाचा असतो, करावयाचा नसतो; तूं खापरीला गुरु मान, आणि तुझें कार्य होतें किंवा नाहीं तें पाहा. "उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्र पालनं ॥ ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवला" ह्या श्री वसिष्ठोक्तीचें हेंच रहस्य आहे, व श्री शंकराचार्यांनीं जी पाषाणमय पंचायतन पूजा सांगितली आहे, तिचें तात्पर्यही हेंच आहे.

**नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे.**

## श्रीसांइनाथांची परिच्छेदत्रयातीतता:

श्री सांईलीलाकर्ते यांस सा. न. वि. वि. आणखी एक गोष्ट आठवली ती आपणांस कळवितों.

सुमारें १५ वर्षें होऊन गेलीं. एके दिवशीं सकाळीं मशीदींत कै. वा. बापूसाहेब जोग वगैरे मंडळीशीं बोलत असतां बाबा म्हणाले कीं, "काका ( कै. वा. भाऊसाहेब दीक्षित ) तापानें फार आजारी आहे. माझ्याशिवाय तो औषध घेणार नाहीं. मला पारल्यास गेलें पाहिजे. पण बापूसाहेब, त्यालाच तूं येथें बोलाव-" हा प्रकार ज्या दिवशीं घडला तो भाऊसाहेबांच्या जबर तापाचा पांचवा दिवस होता, व दुसऱ्याच दिवशीं त्यांना बापूसाहेबांनीं पाठविलेलें श्रीचें बोलावणें येऊन थडकलें. तापांत ते नेहमीप्रमाणें उदी व तीर्थ यांखेरीज औषध असें कांहींच घेत नसत. बापूसाहेबांचें बोलावणें आल्याबरोबर दुसरे दिवशीं सायंकाळीं शिर्डीस निघण्याचा त्यांनीं बेत ठरविला; व आपली धर्मपत्नी कै. वा. सौ. भाबीबाईसाहेब ह्यांना तन्निमित्त कांहीं एक काळजी वाटूं नये, ह्यासाठीं आपल्याबरोबर मला पारल्याहून शिरडीस घेऊन जाण्याचा आपला संकेतही त्यांना त्यांनीं कळ-

विला. निघण्याच्या दिवशीं सकाळीं मला त्यांचें अनपेक्षित बोलावणें आल्यावरून मला त्यांच्या प्रकृतीविषयीं शंका आली, व मी लागलीच त्यांच्या बंगल्यावर गेलों. आणि तेव्हां भाऊसाहेब निजून उठले नसल्या-मुळें मी तावडतोब भाबींना भेटलों. त्यांनीं मला सर्व हकीकत कळविली व पुढें थोडक्यांतच भाऊसाहेब उठल्यावर मीं त्यांची गांठ घेतली, आणि त्यांना असें सांगितलें कीं, मी बरोबर असलों म्हणजे कांहीं एक काळजी करावयास नको, अशी जरी भाबीबाईंची खात्री असली, तरी त्यांना व स्वयंपाकाच्या बाईंना बरोबर घेऊन जाणेंच फार बरें. कारण शिरडीस गेल्यावर बाबा तेथें किती दिवस ठेवून घेतील याचा नेम नव्हता. माझी सूचना त्यांना पटली, व त्याच दिवशीं संध्याकाळीं आम्हीं मुंबईहून शिरडीस जाण्यास निघालों. मनमाड येथें गाडी उभी राहिल्यावर बायकांच्या डब्यांत फक्त दोनच स्त्रिया पाहून कांहीं गोरे शिपाई आंत घुसण्याच्या विचारांत होते, व तेव्हां मीं तेथें नसतों तर कदाचित फारच भयंकर प्रसंग गुदरला असता. कारण त्या वेळीं अशक्ततेमुळें भाऊसाहेबांना त्या प्रसंगाशीं टक्कर मारणें शक्यच नव्हतें. शेवटीं आम्हीं सुखरूपपणें शिरडीस पोहों-चलों, व भाऊसाहेबांचा ताप जो एकदां पारल्यास निघाला, तो पुनः आलाही नाहीं. सद्गुरुपदीं पूर्ण श्रद्धा असल्यास कसाही प्रसंग आला तरी संकटनिवारणाची बुद्धि गुरुकृपेनें सहजच उत्पन्न होते. कारण भेदत्रया-तीततेमुळें "भूतभव्यभवत्प्रभु," भक्तवत्सल, शिष्यसंतापहारक सद्गुरूचें भक्तसंकटनिवारण हेंच मुख्य कार्य असतें. परंतु "गुरवो बहवः संति । शिष्यवित्तापहारकाः ॥ गुरवो विरलाःसंति । शिष्यसंतापहारकाः ॥" असाच ह्या जगाचा प्रकार असल्यामुळें सद्गुरुप्राप्ति अति दुर्लभ आहे, हें रहस्य अपस्वार्थी बहुजनसमुदायाला प्रायः मुळींच समजत नाहीं ! असो. तीव्रवैरा-ग्योपरमहिन् पुरुषाला सद्गुरु समजणें, हें प्रायःभयप्रद आहे, असें सांगून हें पत्र संपविता. कळावें.

श्रीयुत साईलीलाकर्ते यांस, मित्राचे सेवेसी नीलकंठ रामचंद्र सहस्त्र-बुद्धे, मु० पुणें, ता. ९।५।३१ पावेतों श्रीकृपेंकरून सुखरूप असों. वि.

श्रींच्या आणखी कांहीं लीला स्मरणांत आल्यावरून त्या प्रसिद्धी-साठीं आपणांस कळवीत आहे.

(१) सन १९१०-११ मध्यें शिरडी येथें प्रथमतः गेल्यावर एका वेड लागलेल्या अबलेला माझ्या स्वाधीन करावी कां ? असा प्रश्न मित्र कै. वा. भाऊसाहेब दीक्षित वगैरे मंडळींनीं श्रींना विचारल्यावरून श्री म्हणाले कीं " तिला त्या म्हाताऱ्याच्या स्वाधीन करा, तो तिची तात्याबा-प्रमाणें ( कै. वा. तात्यासाहेब नूलकरांना श्री "तात्याबा" म्हणत असत ) उत्तम शुश्रुषा करून तिला नीट करील. ही अबला नित्य रात्रीं मलमूत्र विसर्जन शय्येवरच करीत असे, आणि खरजेनें तिच्या दोन्ही हातांचे घड झालेले होते. शिवाय ती कधीं कधीं कोणाच्याही शय्येवर जाऊन तेथें निजण्याची खटपट करी. ह्यास्तव तिची दया येऊनच भाऊसाहेब वगैरे मित्रांनीं श्रींच्याकडून त्या कामीं माझी नेमणूक करवून घेऊन तो हुकूम मला कळविला, तो ऐकतांच मी क्यूटिक्यूरा सोप आणि पल्व्हिस ग्लिसरा-यझाको तावडतोब आणवून तिच्या शुश्रुषेस लागलों. तिला नित्य रात्रीं ११ वाजण्याचे सुमारास दुसऱ्या एका देवीबरोबर बहिर्दिशेस पाठवून परत आणण्याची प्रथमतः तजवीज केली, त्यामुळें तिचे शय्येवरील विधि एकदम बंद झाले. क्यूटिक्यूरा सोपनें तिचे हात मी स्वतः नित्य दोनदां धूत असे, आणि दोन तीन दिवसांआड तिला पल्व्हिस ग्लिसरायझाको पहिल्या पंधरवड्यांत देत असे; त्यामुळें तिची शरीरशुद्धीही सत्वर झाली. तिला रोज स्नान घालून साठे यांच्या वाड्यांतील झाडाखालच्या देवाला १०८ प्रदक्षिणा तिच्याकडून मोजवून घालवीत असे, आणि प्रत्येक प्रदक्षिणा संपल्यावर तिजकडून देवाला नमस्कार करवीत असे. असा क्रम सुमारें एक महिना चालल्यावर तिची मनःस्थिति चांगली होऊन एके दिवशीं ती मला म्हणाली कीं, " बाबासाहेब ! मी आतां

चांगली बरी झालें आहे, आणि सर्व मंडळींना एक दिवस स्वतः स्वयंपाक करून भोजन घालावें, असें मला वाटतें." हें ऐकून माझ्या मित्रांना फार कौतुक वाटलें, आणि त्यांनीं ती हकीकत श्रींच्या कानीं घालून माझी स्तुति केली. तेव्हां श्री म्हणाले कीं, "त्यांत त्यानें कोणावर उपकार केला? त्यानें आपल्याच सुनेचें काम केलें, त्यांत काय मोठें झालें?" हें कोडें माझ्या मित्रांना न उलगडल्यामुळें, त्यांनीं त्याचा अर्थ मला विचारला; आणि नंतर थोडासा शोध करतां मला असें कळलें कीं, माझ्यापेक्षां वयानें पुष्कळ लहान असलेल्या अशा माझ्याच कुळांतील एका गृहस्थाची ती भार्या होती!

(२) ती अबला शिरडीहून परत गेल्यावर एके दिवशीं सकाळीं सात वाजण्याचे सुमारास तेथील भाऊसाहेब वगैरे मित्र श्री. माधवरावजी देशपांडे यांच्यासह मुंबईस रवाना झाल्यावर मशीदीमध्यें एकाएकीं आपली कफनी वर करून श्री म्हणाले कीं, "साला हमकू देखनेकू आता है. हमारे पास क्या है? हम तो नंगा फकीर है. आगेलंड और पीछे गांड–" हे शब्द ऐकून तेथील सेवेकरी अगदीं चकीत होऊन गेले. कारण तेव्हां मशीदीच्या आसपास कोणीही त्रयस्थ मनुष्य नव्हता. परंतु लागलीच थोड्या वेळानें मध्यभागचे कमिशनर मि. कर्टिस, त्यांचें कुटुंब, नगरचे कलेक्टर मि. मॅकूनील, आणि मध्यभाग कमिशनरचे नेटिव्ह असिस्टंट रा. ब. रामचंद्र नारायण ऊर्फ भाऊसाहेब जोगळेकर ही मंडळी जेव्हां मशीदीवरून चावडीकडे गेली, तेव्हां त्या सेवेकऱ्यांना बाबांच्या अतींद्रिय ज्ञानाची खूण पटून ते श्रींच्या परवानगीनें चावडीकडे गेले. शिरडी येथें कांहीं राजकीय चळवळ आहे किंवा काय, तें पाहाण्यासाठीं ती मंडळी येथें अचानक गेली असल्यामुळें त्यांना पाहातांच तेथील पाटील कुळकर्ण्यांची धांदल उडाली. त्यांनीं चावडींत ताबडतोब तीनच खुर्च्या आणवल्यामुळें आमच्या अगौरकाय मित्रांवर सहजच उभें राहाण्याची पाळी आली. साहेबांच्या स्वाऱ्या म्हणीवर बसल्याबरोबर रावबहादरांनीं जी चौकशी केली तिच्यांत त्यांना

असें समजलें कीं, त्यांना हवी असलेली माहिती देण्यास तेथें त्या वेळीं कै. वा. मित्र श्रीयुत बाळासाहेब भाटे, बी. ए., पेन्शनर मामलेदार, यांच्या शिवाय दुसरें कोणीहि नव्हतें. हें ऐकून त्यांनीं बाळासाहेबांना लागलींच बोलावणें पाठविलें; परंतु कर्टिस साहेबांच्या कारकीर्दीस कंटाळून त्यांनीं मामलेदारी ऐन उमेदींतच सोडली असल्यामुळें, बोलावण्यास आलेल्या पट्टे-वाल्यास त्यांनीं असा जबाब दिला कीं, "मी येत नाहीं असें भाऊसाहेबांना सांग." त्या प्रसंगीं मी तेथेंच होतों व त्या पट्टेवाल्यानेंही मला ओळखिलें होतें, म्हणून मी त्याला असें सांगितलें कीं, बाळासाहेबांच्या निरोपा-ऐवजीं तूं भाऊसाहेबांना असें सांग कीं, तुम्हालाच मी बाळासाहेबांच्या घरीं बोलावलें आहे. माझा निरोप कळतांच भाऊसाहेब मजकडे आले, व नंतर थोडेंसें बोलणें झाल्यावर आम्हीं तिघेही चावडींत गेलों. तेथें गेल्यावर भाऊसाहेब मला म्हणाले कीं, "साईबाबांना आपला प्रातर्विधि लवकर आटपण्यास सांगा. कारण साहेबांना त्यांची भेट घ्यावयाची आहे" हे शब्द ऐकतांच मी थोडासा चकीत होऊन म्हणालों कीं, "तुज नांव नाहीं तर माझें दाव कायी ॥" असें प्रत्यक्ष ईश्वरास म्हणणाऱ्या श्री तुकारामाच्या कोटींतील ते असल्यामुळें तुमची येथें अरेरावी चालणार कशी ? तुम्हांला त्यांच्याशीं कांहीं काम असल्यास त्यांच्या मर्जी-प्रमाणेंच तुम्हाला वागलें पाहिजे. हें माझें भाषण ऐकून साहेबांना वाईट वाटूं नये, ह्या हेतूनें भाऊसाहेबांनीं त्यांना आम्हां उभयतांचा बालपणापासून कसा स्नेहभाव आहे तें समजावून सांगितलें. व नंतर आपला प्रातर्विधि आटोपून श्रीसांई चावडीवरून नित्याच्या भिक्षेस केव्हां जातात त्याची आम्हीं वाट पाहात राहिलों. सुमारें अर्ध्या तासानें श्रींची स्वारी चावडीकडे येतांना दिसतांच मिसेस कर्टिस ह्या खालीं उतरल्या व रस्त्याच्या मध्यभागीं श्रींची गांठ घेऊन त्यांना नम्रतेनें मुजरा करून म्हणाल्या कीं, "महाराजके साथ कुच बात करनेकी है." त्यावर "आधा घंटा ठैर जाव" असें म्हणून श्रींची स्वारी पुढें गेली, आणि अर्ध्या घटकेनें ते परत जात अस-तांना मिसेस कर्टिस यांनीं पुन: पूर्ववत प्रणाम करून तीच विनंती केली

तेव्हां " एक घंटा ठैर जाव " असें सांगून ते मशीदींत गेले. हा प्रकार झाल्यावर शिरडी येथें त्यांना नवल विशेष कांहींच न दिसल्यामुळें व परत जाण्याची घाई असल्यामुळें ती गोरी मंडळी माघारी फिरली, व भाऊसाहेब आणि मीं चावडी नजीक कांहीं वेळ बोलत उभे राहिलों. मध्यंतरीं तेथील गरीबगुरीबांना वाटण्याकरितां सबंध एक रुपया मला देण्याचा आपला मानस साहेबबहादरांनीं जेव्हां आपल्या पत्नीस सांगितला तेव्हां त्यांना फार खेद होऊन त्या म्हणाल्या कीं, आपला अधिकार, प्राप्ति आणि वैभव यांचा विचार करून आपण निदान पंचवीस रुपये तरी दिलेच पाहिजेत. परंतु साहेबबहादूर कर्णाचा अवतार असल्यामुळें त्यांनीं परत माझ्याकडे येऊन मोठया शिकस्तीनें माझ्या हातावर पांच रुपये ठेविले, आणि ते गरीबांना वाटण्याची मला आज्ञा केली. ती ऐकून मी त्यांना म्हणालों कीं, " फार तर ती रक्कम मी श्रींच्या हवालीं करीन. आणि ती गरीबांना वाटून देण्याचीच त्यांची इच्छा असल्यास ती कामगिरी त्यांनीं आपल्या ताब्यांतील पाटील कुळकर्ण्यांना सांगावी. " हे माझे शब्द ऐकतांच "तुम्हास योग्य वाटेल तें तुम्ही करा" असें म्हणून ते पुढें निसटतात तोंच मि. मॅकूनील साहेबांनीं मला पांच रुपये दिले व रावबहादुरांनीं दोन दिले आणि ती सारी रक्कम मीं ताबडतोब श्रींच्याकडे पाठवूनहि दिली. परंतु तिचा स्वीकार न होऊन ती मजकडे परत आल्या कारणानें मी जेव्हां ती आणखी एक वेळ श्रींच्याकडे पाठविली, तेव्हां ती त्यांनीं घेऊन शेजारीं बसलेल्या एका इसमास देऊन टाकली. त्यानंतर थोडयाच वेळानें ती अधिकारी मंडळी नगराकडे परत गेली, व पुढें सुमारें दोन तासांनीं मी जेव्हां आरतीसाठीं मशीदींत गेलों तेव्हां नाथ मला म्हणाले कीं, " त्या गव्हर्नरसाहेबानें दिलेले तीस रुपये मला दे. " मला माहीत असलेली त्या रुपयांची सर्व हकीकत सांगून त्यांना मी म्हणालों कीं, " मला मिळालेले सर्व बारा रुपये मी आपणांकडे लागलीच पाठवून दिले. आणि आपली इच्छा असल्यास मी आपणांस स्वतःचे आणखी अठरा रुपये आणून देतों. " हें ऐकून श्री म्हणाले कीं, " त्या साहेबां-

त्याकडून एकंदर तीस रुपये येणार होते. मला तुझे रुपये नकोत. ” परंतु हें गूढ जरी मला उकललें नाहीं, तरी त्यांतील तथ्य काय आहे, तें मिसेस कर्टिस यांना पुसून मला कळविण्याविषयीं मी जें रावबहादु-रांना पत्र पाठविलें, त्याच्या उत्तरांत त्यांनीं त्या रुपयांसंबंधीं मि. कर्टिस व त्यांची भार्या या उभयतांमध्यें जो संवाद झाला होता तो लिहिला असल्याकारणानें कर्टिससाहेबांचे रुपये पंचवीस व मॅक्नीलसाहेबांचे रुपये पांच मिळून मूळ ठरलेली तीस रुपयांची रक्कम श्रींनीं मजपाशीं मागितली होती, अशी माझी मागाहून सप्रमाण खात्री झाली. बरोबर अशाच प्रका-रचीं इतर अनेक उदाहरणें साईभक्तांपैकीं अनेकांना माहीत आहेत. जास्त चौकशीअंतीं मला असें कळलें होतें कीं, संतकृपा झाल्यास आपणाला पुत्रप्राप्ति होईल, अशा श्रद्धेनें मिसेस कर्टिस सांईपदीं विनीत झाल्या होत्या. परंतु ती श्रद्धा दृढतम नसल्यामुळें आपल्या पतीच्या सोयीकरितां ती श्रींची आज्ञा उल्लंघन करून परत जाणार, हें ओळखूनच श्रींनीं जेव्हां तिची कसोटी पाहिली, तेव्हां तिची खरी परीक्षा होऊन ती हताश झाली ह्यांत नवल तें काय ? जिची थुंकी झेलण्यास हजारों प्रापंचिक महा पंडित तयार असणार, तिला अशा तुच्छपणानें वागविण्याची खऱ्या संतांशिवाय कोणाची छाती होणार ? शेवटीं त्या बड्या अधिकाऱ्यांच्या ग्रामप्रवेशाच्या वेळचे श्रींचे शब्द ज्यांना अश्लील वाटतील त्यांनीं श्रीतुकारामाचा “ वृद्ध-पणीं आली जरा ॥ शरीर कांपे थरथरा ” इत्यादि अभंग समग्र वाचावा अशी सूचना करून हें पत्र संपवितों.

# सूचिपत्र.

कोणतीहि केका लवकर सांपडावी म्हणून श्लोकाच्या पहिल्या चरणाच्या प्रथम अक्षराचा वर्णानुक्रम धरून खालीं मागील ग्रंथाचें सूचिपत्र करून दाखविलें आहे.


| श्लोकाचा प्रथमचरण. | केका |
|---|---|
| अगाप्रणतवत्सलाम्हणतित्याजनांपावलां ... ... ... | १ |
| अतर्क्यमहिमातुझागुणहिफारबाहेविधी ... ... ... | २७ |
| अतिप्रियसुखप्रदप्रथमतूंमुदंभोद्या ... ... ... | ७० |
| अनावरपिशाचिकाविषयवासनासत्यजी ... ... ... | ५३ |
| अभीष्टवरितातजेतवकथेसिविश्वासती ... ... ... | १०५ |
| अवश्यकरणेंखरेंप्रणतरक्षणस्वोचित ... ... ... | ४७ |
| अशीतरिकृतज्ञताहरितुझ्याचठायींअगा ... ... ... | ११ |
| असंख्यखळसंगरींनिजकरींतुवांमारिले ... ... ... | १० |
| असानकरिताजरींछळतरींप्रभोतोभली ... ... ... | ७७ |
| असेंनम्हणशीलतूंवरदवत्सलश्रीकरा ... ... ... | ९३ |
| असेंहिउपदेशितीगुरुरहस्यमंदारुचे ... ... ... | ६० |
| असोततजआमुचींसकलभाविकायुर्बलें ... ... ... | ९२ |
| असोहरिकसातरीविमलभावज्याचाकरा ... ... ... | ६३ |
| अहानिपटधृष्टमींप्रभुवरासिकांलाजसी ... ... ... | ६६ |
| अहाबहुविशुद्धहेंप्रभुतवस्वरूपाहुनी ... ... ... | १०४ |
| कथाभुवनमोहिनीअशिनमोहिनीहोयतो ... ... ... | १०३ |
| कथाश्रवणचत्वरींजरिपुनःपुन्हायेरते ... ... ... | १०१ |
| कथांसिउपमादिलीसुरभिचीदिसेनीटती ... ... ... | ५१ |
| कथासुपुरुषातुझ्यावशकरीतशीराधिका ... ... ... | १०२ |
| कथासुरभियाभल्यास्वजननीहुनीवाटती ... ... ... | ५८ |
| करांबुजअसोनसेंउचितत्यासमींपामर ... ... ... | ६२ |
| करालपुरतीदयातरिअसोंदिलेंपावलें ... ... ... | १४ |
| कराश्रवणएवढेंअपटलोकहांसोमला ... ... ... | १०६ |
| कवीश्वरमनःपयोनिधिसुतास्तुतीच्यापते ... ... ... | ३२ |
| कसेंतरिअसोमगस्वपणरक्षणाकारणें ... ... ... | ५६ |
| कसेंतरिकरूंतझेंअत्रनपूरवूंआळजी ... ... ... | ४८ |

केका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| कळीकरिसुनिर्मळींपरमउग्रदावानळीं | ... | ... | ... | २१ |
| कारुण्यांभोदरामप्रियसखगुरुहीजोमयूरानटाचा | | ... | ... | १२२ |
| कितीवयकसेंतपप्रखरकायविश्वासतो | ... | ... | ... | ६५ |
| कितीश्रवणझांकितीप्रभुहिकायतेपोळती | ... | ... | ... | ३० |
| कृतांतकटकामलध्वजजरादिसोंलागली | ... | ... | ... | ४६ |
| कृपाचिजननीतुझीसकलजीवदायादया | ... | ... | ... | ९७ |
| खराजनकतूंजनाइतरकोणहोदेववी | ... | ... | ... | ९३ |
| खरासुरजसातसीविषयवासनाहेखरी | ... | ... | ... | ९५ |
| खरीकरितसेकसीतवजनींहिसत्तापहा | ... | ... | ... | ९७ |
| गमोमधुरहेंविषस्तवनसेवितोंमाजवी | ... | ... | ... | ३१ |
| चिकित्सकभलाभलाम्हणुनीफारवाखाणिला | | ... | ... | ४४ |
| छळालकृपणाखिकांअजिदयानिधेकापिती | ... | ... | ... | ७९ |
| छळीनृपबळीबळीतरिचतोनसेआटला | ... | ... | ... | ७६ |
| जगत्त्रयमनोहराबलगुणैकरत्नाकरा | ... | ... | ... | ८३ |
| जगद्गुरुमहेश्वरप्रभुशिरींजिचेंनांदणें | ... | ... | ... | १०९ |
| जगींतरिअसेंअसेशिशुहिजेमुखेंवर्णवी | ... | ... | ... | २६ |
| जरींम्हणसिबांधिलेंतरिंनकष्टवीलेंकरा | ... | ... | ... | ८७ |
| जशीपृथुकतंदुलप्रसृतिआप्तकामातसी | ... | ... | ... | ३८ |
| जिणेंरसपहावयाप्रशिथिलांरदींचाविलीं | ... | ... | ... | ३९ |
| तईप्रभुवरातसेसदयकांअसेआजहो | ... | ... | ... | ८१ |
| तनूभववनींत्रितापदवपावकेंकावली | ... | ... | परिशिष्ट | १ |
| तरेंनतुमच्याबळेंभवमहानदीनाविका | ... | ... | ... | २२ |
| तसाचिउरलोंकसापतितमींनसेकायकीं | ... | ... | ... | ४ |
| तिलाहिबरवीह्मणाउचितहोयतोषाकरें | ... | ... | ... | ३६ |
| तुझाचीअवतारतोसुतपराशरचावळे | ... | ... | ... | ७३ |
| तुझेंकथितिगोपिकाविविधतीसबोभाटरे | ... | ... | ... | ८६ |
| तुझेंकुशलनामजोनरहळूहळआकळी | ... | ... | ... | ७४ |
| तुझेंचरितसन्मुखेंश्रवणजाहलेंयास्तव | ... | ... | ... | ११५ |
| तुझेंयशचितारितेंपरिनकेवळातारवे | ... | ... | | ११६ |
| तुझ्यागुणकथामहासुरभित्यांतहीरासभी | ... | ... | ... | ५४ |
| तुझ्याजिरविलेबहुप्रणतमंतुपोटेंपण | ... | ... | ... | ११८ |
| तुझ्याबहुतशोधिलेंअघनिधीपदाचारजें | ... | ... | ... | ३ |
| तुझासमचिहेंगुणेंअणुउणेंनसेनामहा | ... | ... | ... | ७५ |

| | |
|---|---|
| | ककां |
| तुह्माहरिहरांतज्यादिसतसेदिसावास्तव ... ... ... | ७१ |
| तुम्हींकरुनिदाविलाभुवकृतार्थजैसादरें ... ... ... | ६४ |
| तुह्मींपरमचांगलेबहुसमर्थदातेअसे ... ... ... | २९ |
| तुम्हींबहुभलेमलाउमजहोयऐसेंकथा ... ... ... | १०० |
| तुह्मींहीबळिबांधिलाम्हणुनिआमुचीमायजी ... ... | ८८ |
| तुलास्वयमुनेसवेंकुवलयद्युतिश्यामला ... ... ... | ११० |
| दयाब्दवळशीलतूंतरिनचातकासेवका ... ... ... | २० |
| दयामृतघनाअहाहरिवळामयूराकडे ... ... ... | १२१ |
| दिलेंफिरुनिघेतलेंअशिअकीर्तिलोकींनहो ... ... ... | १५ |
| दिसेंम्हणुनिशाश्वतप्रकृतिरंकमींकायहो ... ... ... | २४ |
| धनापरिजनाघरींतुमचियाउणेंकायसें ... ... ... | २३ |
| ध्रवस्तवनिंआवडीधरिम्हणोनिअत्यादरें ... ... ... | ६२ |
| नकोछळअधीरमींतसिनकीर्तिहोचामरें ... ... ... | ७८ |
| नजेंप्रियसदोषतेंप्रियसदोषहीचांगलें ... ... ... | ८५ |
| नतावनधृतव्रतज्वलनतूंचिबाधावनीं ... ... ... | ६ |
| ननिश्चयकधींढळोकुजनविघ्नबाधाटलो ... ... ... | ११९ |
| नपावसिम्हणोनिमींह्मणतसेतलाआळसी ... ... ... | ८ |
| नव्हेअनृतसत्यतेंअचळऊचलीलाकरें ... ... ... | ४३ |
| नहोयकवणाहितेंतुमचियाचिलीलालसें .... ... ... | १९ |
| निजस्तुतितुह्मांरुचेस्तवितित्यांजनांतर्पितां ... ... ... | २८ |
| पटुत्वसकलेंद्रियींमनुजतासुवंशींजनी ... ... ... | १२ |
| पदाब्जरजजेंतुझेंसकलपावनाधारतें ... ... ... | २ |
| पिताखळपरंततीगुणवतीसतीचांगली ... ... ... | ३५ |
| पिताजरिंत्रिटेविटोनजननीकुपुत्रींविटे ... ... ... | ९५ |
| प्रभुत्वतरिहेंचकींकरुनिदेकृपादानतें ... ... ... | ६६ |
| प्रभुस्तुतिनठाउकीपरितिच्यामहाकामुका ... ... ... | २५ |
| प्रभोतुजनमोहिनीभुलविमोहिलामोहिती ... ... ... | ११२ |
| प्रभोशरणआलियावरिनव्हाकधींवांकडे ... ... ... | ४० |
| प्रसन्नबहुहोतसांपरिकरालहोवावरें ... ... ... | ६८ |
| प्रसिद्धतुमचेंमहासदयपायजीवांकडे ... ... ... | ८९ |
| बुडेबुडविसागरींतिरसुकर्णधाराविना ... ... ... | ११७ |
| भजेसुदृढनिश्चयेंद्विजकुमारकक्षीरधी ... ... ... | ६९ |
| भरोनिकुचकुंभजीविषरसेंमुखींदेवकी ... ... ... | ९८ |

केका

भलेपरिशिलेसुरासुरनरींतसेलक्ष्मी ... ... ... ५१
भलेंस्मरणजाहलेंसमयिंकंसदासीकरें ... ... ... ३७
भवन्मतिसआवडेजरिंधनादिकालागिते ... ... ... ५२
मलानिरखितांभवच्चरणकन्यकाआपगा ... ... ... १०
मुखासिंजवपातलींश्रमअरण्यपेशींपदें ... ... ... ८०
मुखींहरिवसोतुझोकुशलधामनामावली ... ... ... १२०
म्हणामजउताविळागुणचिघेतलाघाबरें ... ... ... ४५
म्हणेस्वकृतिच्याउणींकिमपिएकवर्णीनहो ... ... ... ६१
म्हणेंक्षणमुरांतकक्षणपुरांतकब्राह्मणा ... ... ... ७२
म्हणोनिकवितासुतातुजसमर्पितोंसाजरी ... ... ... ३३
म्हणोनिबहुमोहिनीहुनिभलीकथाहेतुजी ... ... ... १०७
वरीप्रकटशांतिलाधरिपरंतुमीनावकी ... ... ... ९१
विटेलजननीहिकींशतरचीनिमित्तेंविधी ... ... ... ९६
विपाकनगणोनिम्यांप्रकटआपुल्याघातकें ... ... ... ४२
व्रजावनकरावयाबसविलेंनखाग्रींधरा ... ... ... ५
शिवेनतुझियापदाअदयताख्यदोषक्षण ... ... ... ४१
शुकोदितपुराणज्याश्रवणसन्मुखेंसाग्रही ... ... ... १११
सदाश्रितपदासदाशिवमनोविनोदास्पदा ... ... ... १
सदाहिहितनायकोंबहुअपायकेलेकरूं ... ... ... ९२
सदैवअपराधहेरचितसेंअसेकोटिगा ... ... ... १७
सदैवनमितांजरींपदललाटकेलेंकिणें ... ... ... ११
समागमतुझाघडोम्हणुनिजाहलेलांकडें ... ... ... ८२
सुखेंचिसुखबाळकाप्रगटहोयमातेचिया ... ... ... ४९
सुपात्रनरमाहियद्रतिसुखासदारापरी ... ... ... ७
सुरर्षिजवळींस्वयेंम्हणसितत्रतिष्ठामिया ... ... ... ११३
सुरर्षिम्हणतीतुझेंयशचिधन्ययोगायना ... ... ... ११४
सुरासुरनरोरगाभुलवुनीकथानत्यजी ... ... ... १०४
सुविद्यधनमेळवीवचनआइकेआवरी ... ... ... ९३
सुसंगतिसदाघडोसुजनवाक्यकानींपडो ... ... ... ११८
स्मरोनिकृतमंतुलानकवितावधूस्वीकृती ... ... ... ३४
स्वदाससमर्यीजपेतरिनदेवराचाकरी ... ... ... ८४

## सूचना

श्री दासगणू महाराजांच्या "अर्वाचिन भक्त व संतलीलामृत या दोन भक्तिभावनेनें परिप्लुत पोथ्यांत श्रीसांईबाबांच्या संबंधानें एकंदर चार प्रासादिक अध्याय प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत श्री संतलीलामृत ही पोथी अत्यंत दुर्मिळ झाली आहे, तेव्हां या दोन्हीं पोथ्यांतले हे चार अध्याय पुन्हां प्रसिद्ध व्हावेत. जेणेंकरून श्री सांईमाउलीच्या भक्तांना नित्यनैमितिक पठण करण्यास सोईवार व्हावें, अशी अनेक भक्तांकडून सूचना आल्यावरून ते अध्याय श्रीसांईलीला मासिकांत पुन्हां प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

**रा. आ. तर्खड**
संपादक **श्रीसांईलीला.**

---

**ह. भ. प. श्री दासगणू महाराजांच्या अर्वाचिन भक्त व संत लीलामृत या दुर्मिळ झालेल्या पोथ्यांतून श्री सच्चिदानंद सद्गुरु सांईनाथमहाराजांच्या संबंधानें प्रसिद्ध झालेल्या अध्यायांचें श्रीसाईभक्तांच्या विनंतीवरून पुनर्मुद्रण.**

---

# अर्वाचिन भक्त लीलामृत

## अध्याय ३१ वा.

**श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी पंचतुंडा उमापती । जयजयाजी प्रतापज्योती । तुझें बालक मी निश्चितीं । माझी उपेक्षा करूं नको ॥ १ ॥ कैलास पर्वत परम रम्य । तें त्वां केलें निवासधाम । प्रदोषकाळीं पुरुषोत्तम । तुजलागीं ध्यातसे ॥ २ ॥ पूर्वीं दक्षप्रजापतीः । तुज अवमानितां पशुपती । कोपोनी तूं निश्चितीं । वीरभद्र प्रगटविला ॥ ३ ॥ स्वभक्तांचें करण्या रक्षण । दक्ष असती तूं**

काय तुझ्या आलें मनीं । कीं हा पातकी अज्ञानी । ह्मणोनी हे शूलपाणी । भेटसीना अझूनी मज ॥ ५ ॥ परी व्याधाचें मनीं वृत्त । आणणें हे उमानाथ । मी लेंकरूं तुझें सत्य । माझी उपेक्षा करूं नको ॥ ६ ॥ असो ईश्वराचे भक्त निर्वाण । कोणत्याही जातींत पावोत जनन । ते साक्षात् होती नारायण । तेथें शंका घेणें नको ॥ ७ ॥ जयांची मुळींच एक जाती । जैसी हृदयांत प्राणज्योती । किंवा जगांत एक विभूती । ईश्वर जैसा साच कीं ॥ ८ ॥ मतें पंथाभिमान । यांतें न ज्यांच्या चित्तीं स्थान । तेथें द्वैत कोठून । करी रिघाव सूज्ञ हो ॥ ९ ॥ पूर्वी कमाल कबीर । होऊन गेले भक्त थोर । त्यांचे जातीस परमेश्वर । काय पाहता जाहला ॥ १० ॥ ईश्वर भावाचा भुकेला । हाची आहे दुष्काळ त्याला । सद्भक्तीस असे विकला । दयाघन पांडुरंग ॥ ११ ॥ कोणत्याही जातींत । वा कोणत्याही स्थितींत । निर्माण होवोत भगवद्भक्त । ते प्रिय हरीतें ॥१२॥ गंगेचिया दक्षिणेस । ग्राम एक चार कोस । शिरडी नाम विलसे त्यास । कोपरगांवा संनिध ॥ १३ ॥ तया शिरडी ग्रामासी । आले महाराज पुण्यराशी । बाबासाई जयासी । ह्मणती अवघे भक्तजन ॥ ४ ॥ तयांचा तो ठावठिकाण । न कळे कवणालागून । चित्त आनंदमय पूर्ण । जयाचें तें सर्वदां ॥१५॥ कोणी जरी केला प्रश्न । कीं आपण आलांत कोठून । ठावठिकाण नामाभिधान । काय सांगा आपुलें ॥ १६ ॥ ऐसा प्रश्न होतांक्षणीं । महाराज देती उत्तर झणीं । जेवीं मेघगर्जना होतां गगनीं । धारा अवतरती भूवरी ॥ १७ ॥ आह्मास नाहीं ठावठिकाण । आह्मी मुळींच निर्गुण । कर्मवशे पावून बंधन । पिंडामतो पावलों ॥ १८ ॥ या पिंडासी देह ह्मणती । देही आमुचें नांव निश्चितीं । विश्व हेंची गांव निगुती । आमुचें जाणा सर्वथा ॥ १९ ॥ ब्रह्म आमुचा जनिता ॥ माया आमुची माता । ययोगें ती साकारता । आम्ही पावलों शरीर हें ॥ २० ॥ हेंची

तयाचें प्रत्युत्तर । लोकांचिये प्रश्नावर । जग अवघें नश्वर । भावना जयाची सर्वदां ॥ २१ ॥ त्या महाराजें शिरडींत । चमत्कार केले अगणित । सकल वर्णावया येथ । नाहीं मती दासातें ॥ २२ ॥ आधींच तें गांव लहान । त्यांतून थोडकीं दुकान । तींही असतीं बहुत सान । हिंगबोजवार विक्रीचीं ॥ २३ ॥ त्या दुकानदारांपासीं । महाराज मागून तेलासी । दीप लाविती मशिदीसी । तैसेच देउळीं अगणित ॥ २४ ॥ ऐशापरी कित्येक वेळां । साईनें दीपोत्सव केला । नित्य तेल देण्याला । वाणी अवघे कंटाळले ॥ २५ ॥ दुकानदार अवघे जन । करिती विचार एकवटून । रोज आणावें कोठून । तेल यातें द्यावया ॥ २६ ॥ ऐसा विचार करूनी मानसीं । महाराज येतां दुकानासी । खोटेंच सांगती तयांसी । तेल नाहीं म्हणूनियां ॥२७॥ ऐसें उत्तर ऐकतांक्षणीं । बाबा चकित झाले मनीं । असत्य वदण्या यांलागूनी । कांहीं न वाटे अवघड ॥ २८ ॥ यानेंच हे बुडाले जन । दुरावला नारायण । पुढें हे पावली पतन । आपुलिया कर्मवशें ॥ २९ ॥ जो असत्य वदे वाणी तो पातक्यांचा मुगुटमणी । तयासी तो चक्रपाणी । न भेटे कदापी ॥ ३० ॥ सत्य वाक्य ज्याचे जवळ । तयाचा विकला घननीळ । जपतपादि सकळ । सत्यापुढें बापुडे ॥ ३१ ॥ सत्य पुण्याईचा घाट । सत्य ही मोक्षाची वाट । सत्य आनंदनदीचा घाट । तें सत्य न सोडावें ॥ ३२ ॥ वाण्यांसी न देतां प्रत्युत्तर । महाराज निघाले सत्वर । कृत्य केलें अघटित थोर । अगाध लीला बाबांची ॥ ३३ ॥ मशिदीच्या सभोंवार । पणत्या ठेविल्या प्रचुर । कांकडे घातले आंत थोर । कौतुकें लोक पाहती ॥ ३४ ॥ जन परस्परें बोलती । तेलावीण कैसे लागती । दीप येथें निश्चितीं । वेडापीर असे हा ॥ ३५ ॥ खडकीं पेरणें बीजालागून । अथवा वांझेचें बाळंतपण । करावया सूज्ञ जन । ईच्छील काय कधीं तरी ॥ ३६ ॥ हा वेड्यांचा शिरा-

मणी । अज्ञान्यांचा अग्रगणी । दीप तेलावांचूनी । लावावया इच्छितसे ॥३७॥ तेल होतें टमरेलांत । लावण्यापुरतें सांजवात । तें घेऊन हातांत । गेले बाबा मशिदीसी ॥ ३८ ॥ तैं नानासाहेब डेंगळे । लोकांसी बोलूं लागले । तुह्मीं अंध झालां सगळे । उगी तयासी निंदूं नका ॥३९॥ कोणाची योग्यता कैशापरी । हें एक जाणें श्रीहरी । हिरा पडला जरी गारीं । तरी कां गार मानावा ॥४०॥ कांहीं वेळ वसा स्वस्थ । हा फकीर काय करितो येथें । तें पहा हो सावचित्त । वृथा घाई करूं नका ॥ ४१ ॥ ऐसें लोकांस सांगितलें । डेंगळे मशिदीसी आले । मौनव्रत धारण केलें । चमत्कार पहावया ॥ ४२ ॥ तैं काय केलें महाराजांनीं । तेलांत घालून अर्धें पाणी । आत्मारामालागूनी । अर्पण केलें तेधवां ॥ ४३ ॥ तेलमिश्रित पाणी प्याले । मग निवळ पाणी घेतलें । पणत्यां माजीं ओतलें । स्नेहाऐवजीं तत्क्षणीं ॥ ४४ ॥ काडी ओढून पेटविले । दीप बाबांनीं अवघे भले । चकित झाले डेंगळे । पाय धरले जावोनि ॥ ४५ ॥ दिवे जाळिले रात्रभर । लोक पाहती चमत्कार । केवढा बाबांचा अधिकार । प्रती ईश्वर जन्मला ॥ ४६ ॥ शिरडीचे लोक मिळाले । साईपदीं लीन झाले । ह्मणतो आह्मी अपराध केले । कोपूं नका आह्मांवरी ॥ ४७ ॥ आह्मीं पोरें तुमचीं । तुह्मीं आहां माय साची । क्षमा करा अपराधांची । साई महाराज कृपानिधी ॥ ४८ ॥ तुह्मीं कृपेचा सागर । तुह्मीं ज्ञाननभींचे दिनकर । तुह्मीं सद्गुणांचें सरोवर । शांततेचे मेरु तुह्मीं ॥ ४९ ॥ तेधवां बाबा अवघ्यांप्रती । बोलूं लागले निश्चितीं । तुह्मीं ऐकारे माझी उक्ती । ये समयीं सावचित्तें ॥ ५० ॥ वर्तन ठेवा ऐशापरी । जेणें राजी राहील श्रीहरी । असत्य न वदावी वैखरी । सत्य सदां सांभाळावें ॥ ५१ ॥ घातपात कवणाचा । करूं नका कधींच साचा । धर्मकर्मीं द्रव्याचा । व्यय करावा यथाशक्ती ॥ ५२ ॥ तरीच होईल कल्याण । अंतीं भेटेल

नारायण । हें माझें सत्य वचन । सदां वागवा मानसीं ॥ ५३ ॥ तें मानलें अवघ्यांनी । वंदून साईचरणांसी । लोक गेले स्थानासी । अती आनंदें आपल्या ॥ ५४ ॥ साई महाराज योगाभ्यासी । किती वर्णावें तयांसी । त्यांच्या अगम्य लीलेसी । वर्णितां नये पार कधीं ॥ ५५ ॥ हें अखिल वर्तमान । चितांबरालागून । डेंगळ्यांनीं केलें कथन । तेही भाविक ह्मणोनियां ॥ ५६ ॥ असो शय्या विचित्र बाबांची । एक फळी लांकडाची । रुंदी एक वीत साची । असे लांब चार हात ॥ ५६ ॥ तीच त्यांचा स्यंदन । तीच त्यांचें हंतरुण । जीर्ण चिंध्यांनीं बांधून । टांगिलीसे मशीदींत ॥ ५६ ॥ ती मशीद होती जीर्ण । किलचाही गेल्या निघून । अगदीं अढ्याचे सन्निधान । फळी टांगिली बाबांनीं ॥ ५७ ॥ नुसतें बैसतां तिच्यावरी तनू होय धनूपरी । ऐशा विचित्र शय्येवरी । शयन करिती महाराज ॥ ५८ ॥ फळीचे उभय बाजूंसी । ह्मणजे उशापायथ्यासी । लावून दिवे पुण्यराशी । निजती योगबळानें ॥ ५९ ॥ नुसता पाय ठेवितां वरी । जी तुटेल निर्धारीं । ऐशी तिची बळकटी खरी । काय वर्णन करावें ॥६०॥ तें असत्य वाटे कित्येकांस । ह्मणून मुद्दाम रात्रीस । जाऊन पाहती बाबांस । तों ते निद्रिस्थ फळीवरीं ॥६१॥ ही मौज पाहण्याप्रती । दाटी होऊं लागली अती । तेणें उपाधी निश्चितीं । होऊं लागली सर्वदां ॥ ६२ ॥ त्या फळीस ह्मणूनी । तोडून टाकिलें एके दिनीं । मोकळें त्रासापासूनी । शीघ्र व्हावया कारणें ॥ ६३ ॥ ख्याती झाली लोकांत । बाबासाई महा महंत । नवसही अनंत । करूं लागले तयांप्रती ॥ ६४ ॥ शिरडी झालें महाक्षेत्र । वाराणसी-सम पवित्र । बाबामुळें सर्वत्र । नांव झालें तियेचें ॥ ६५ ॥ जैसें पुष्पयोगें मृत्तिकेस । किंवा हिऱ्यामुळें कोंदणास । वा सुवर्णामुळें चिंधीस । महत्व येतें तैशापरी ॥ ६६ ॥ तैसें शिरडीस बाबामुळें । भूमंडळीं महत्व आलें । खेड्याचें क्षेत्र बनलें । थोर योग्यता साधचों

॥ ६७ ॥ असो एके समयासी । मंडळी आली बहूवसी । तया शिरडी ग्रामासी । सिद्धदर्शन घ्यावया ॥ ६८ ॥ चांदोरकर कुळभूषण । गोविंदात्मज नारायण । कलेक्टराचा चिटणीस जाण । नानासाहेब ह्मणती जया ॥ ६९ ॥ दुजे रामदास हरिदास । वास जयांचा वाईस । तिसरे त्यांचे सोबतीस । होते बापू नगरकर ॥७०॥ कानगांवकर ते चौथे । ऐसे जमोन आले तेथें । सिद्धदर्शन घ्यायातें । शिरडीग्रामीं श्रवण करा ॥ ७१ ॥ त्या रामदासी बुवासी । जाणें होतें दुसरे दिवशीं । हनुमंताच्या जयंतीसी । सीनातटीं नगरांत ॥ ७२ ॥ ते तळमळ करूं लागले । म्हणती पाहिजे आतांच गेलें । दर्शन घेणें पुरे झालें । चला गाडी आटोपा ॥ ७३ ॥ तैं महाराज म्हणती चिटणीसासी । प्रथम करूनी भोजनासी । मग जावें वाटे मशीं । तुम्हीं नगराकारणें ॥ ७४ ॥ या ऐकोन महाराज वचना । स्तब्ध झाले साहेबनाना । घेऊन कानगांवकरांना । केली तयारी भोजनाची ॥ ७५ ॥ हिकडे तो वाईकर । जावया झाला बहुत आतुर । म्हणे अहो बापूनगरकर । काय विचार करणें आतां ॥७६॥ माझी उद्यां आहे कथा । नगरामाजीं तत्वतां । या वेड्याच्या नादीं आतां । लागणें पुरे झालें ॥ ७७ ॥ चिटणीसाचें आहे ठीक । घरीं पैसा मुबलक । मला मागणें येईल भीक । लागतां नादीं साईच्या ॥ ७८ ॥ येथें न प्राप्ति कवडीची । चला वाट धरूं स्टेशनाची । गाडी पाहिजे आतांची । साधिली आपणां अवश्य ॥ ७९ ॥ ऐसें बोलून निघाले । उभयतां स्टेशनावरी आले । मागें शिरडीस राहिले । कानगांवकर व चिटणीस ॥ ८० ॥ महाराज म्हणती चिटणीसासी । पहा जनांची रीत कैसी । सोडोनी साथिदारांसी । दक्ष असती मतलबा ॥८१॥ म्हणोनी ऐसा करावा साथी । जो न सोडी कल्पांतीं । जैसा सुवास सुमनाप्रती । कधींही न विसंबे ॥ ८२ ॥ असो झालीं भोजनें । आतां तम्हींही येथुन जाणें । जें बोललों तें मनीं

धरणें । अवकाश आहे गाडीस ॥ ८३ ॥ तें मानिलें चिटणीसांनीं । ठेवून मस्तक साईचरणीं । निघते झाले तेथोनी । स्टेशनावरी यावया ॥ ८४ ॥ इकडे बापू आणि कथेकरी । बसले उपाशीं स्टेशनावरी । चडफडत आपुले अंतरीं । कांहीं न मिळे खावया॥ ८५॥ चिटणीसांना पाहून । गेले दोघे विरघळून । खालीं घालोनीयां मान । माती उकरीत बैसले ॥ ८६ ॥ चांदोरकर पुसती तयासी । कां हो न गेलां नगरासी । गाडी न मिळाली वाटतें मशी । तुम्हां जावया कारणें ॥ ८७ ॥ तैं म्हणे तो नगरकर । आज गाडीस आहे उशीर तीन घंटे साचार । मेलों उपाशीं मात्र आम्हीं ॥ ८८ ॥ साधूचें नायकिलें । त्याचें हें फळ लाधलें । तुम्हीं मात्र बरें केलें । फजीत आम्हीं पावलों ॥ ८९ ॥ मग अवघे बसून गाडींत । आले शहर नगराप्रत । त्रिकालज्ञ बाबा सत्य । नमन माझें तयांसी ॥ ९० ॥ असो शिरडी ग्रामींचा । अप्पा कुळकर्णी होय साचा । शुद्ध भाव जडला त्याचा । साईचिये पदापाशीं ॥ ९१ ॥ पूर्वकर्म जैसें असे । तैसी बुद्धि होतसे । त्या आप्पाच्या कर्मवशें । काय घडलें तें ऐका ॥ ९२ ॥ कांहीं एके कामांत । अप्पावरी आली आफत । ती खरी अथवा खोटी सत्य । हें ठाऊक ईश्वराला ॥ ९३ ॥ गवगवा झाला लोकांत । अप्पा कुळकर्णी लबाड सत्य । तैसेंचि भूपाचे मनांत । आलें असे त्याविषयीं ॥ ९४ ॥ कोणी म्हणती तयावरती । खटला होणार निश्चितीं । ऐसें ऐकतां चित्तीं । धडकी अप्पाच्या भरली असे ॥ ९५ ॥ अप्पासी केलें बोलावणें । प्रांताच्या साहेबानें । हुकूम लिहून धाडिला त्यानें । यावें तुम्हीं जबाबा ॥ ९६ ॥ हुकूम पडतां हातांत । आप्पा झाला भयभीत । म्हणे आतां शिरडीप्रत । येणें कशाचें घडतें हो ॥ ९७ ॥ निघते वेळीं तयांनीं । बाबांस जोडिले दोन्ही पाणी । बोलता झाला गहिंवरूनी । कठिण प्रसंग आला हा ॥ ९८ ॥ तुम्हीं साधु सत्पुरुष । तुम्हीं साक्षात श्रीनि-

वास । तुम्हीं शास्ते काळास । हें मी जाणतों गुरुराया ॥ ९९ ॥ ही माझे वरची आफत । सत्य आहे किंवा मिथ्य । हें जाणसी तूं समर्थ । त्रिकालज्ञ महाराजा ॥ १०० ॥ त्याविषयीं बोलणें नाहीं । अब्रू राख माझे आई । रडूं लागला धायी धायी । पायां मिठी घालोनी ॥ १०१ ॥ माझें कांहीं वाईट होतां । आपलें नांव जाईल समर्था । याचा विचार आणोन चित्ता । संकट माझें हरावें ॥ १०२ ॥ जवळीं असतां कुबेर । कां हिंडावें दारोदार । सोडोनी क्षीरसागर । मीन जाय ओहोळाकडे ॥ १०३ ॥ माझा वशिला तुझे पाय । तूंचि माझी बापमाय । या वेळीं साह्य होय । संकट माझें हरावें ॥ १०४ ॥ मजला म्हणती अवघे जन । हा बाबांचा कल्याण । शिक्षा होतां मजलागून । काळोखी लागेल तुम्हांतें ॥ १०५ ॥ कामधेनूचे पोरांनीं । कां लागावें अन्यस्तनीं । कल्पवृक्षाचे फळांनीं । कां पडावें कांटयांत ॥ १०६ ॥ ह्याचा करा विचार । कृपा करा माझे-वर । जगांत अवघ्या नाहीं तर । निंदा होईल आपुली ॥ १०७ ॥ ऐसें ऐकतां दीन वचन । महाराज द्रवले मनीं पूर्ण । बोलले अप्पा-लागून । ऐक वचन माझें हें ॥ १०८ ॥ नेवाशास प्रांतस्वारी । आहे सांप्रत प्रवरातीरीं । तुवां जावें तेथवरी । भय चित्तीं मानूं नको ॥ १०९ ॥ तेथें जगाचा सूत्रधार । मोहिनी रूप परमेश्वर । ज्या नमिता झाला ज्ञानेश्वर । भावार्थदीपिका लिहितांना ॥ ११० ॥ जो दशावतार धरिता । जो अल्लाइलाही तत्वतां । मूढ जीवांचे उद्धा-रार्था । सगुण झाला परमेश्वर ॥ १११ ॥ तया करूनी नमस्कार । साहेबापुढें व्हावें हजर । पाठ तुझी साचार । तोचि राखील निश्चयें ॥ ११२ ॥ तें अप्पानें मानिलें । प्रवरातटास येणें केलें । मोहिनी-राजास वंदिलें । मग गेले कचेरीस ॥ ११३ ॥ हृदयीं बाबांचें स्मरण । जबाब दिला लिहून । तो साहेबानें ऐकोन । सोडून दिलें तयातें ॥ ११४ ॥ साहेब म्हणे अप्पासी । त्वां न खाल्लें पैशासी । तेथें